

HISTORY
BY
I. SHRIKANT

# सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळ











# राजा राममोहन रॉय (1772 - 1833)

- जन्म :22 मे 1772, राधानगर (प. बंगाल )
- मूळ आडनाव : बॅनर्जी
- पर्शियन, अरबी, संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच, ग्रीक, लॅटिन, हिब्रु इ.भाषांवर प्रभूत्व.
- हिंदू, इस्लाम, ख्रिश्चन धर्माचा अभ्यास केला

- 1803 : ईस्ट इंडिया कंपनीचे ढाका येथील कलेक्टर थॉमस वूडफर्ड यांचे दिवाण पद स्वीकारले
- 1815: कोलकाता येथे आत्मीय सभेची स्थापना.
- या सभेच्या स्थापनेवेळी द्वारकानाथ टागोर, प्रसन्नकुमार टागोर, डॉ. राजेंद्रलाल मिश्र, राजा कली, शंकर घोषाल, आनंद प्रसाद बॅनर्जी रॉय यांचे सहकार्य होते



- 1817 :   कोलकाता येथे डेव्हिड हेयर यांच्या सहाय्याने 'हिंदू कॉलेज' ची स्थापना.
- 1822 : कोलकाता येथे अँग्लो हिंदू स्कूलची स्थापना.
- 1822 : ब्रिटीश इंडिया युनिटेरियन असोसिएशनची स्थापना

- 1826 :  कोलकाता येथे वेदांत कॉलेजची स्थापना.

# 20 ऑगस्ट 1828 : ब्राम्हो समाज

- आत्मीय सभा आणि ब्रिटीश इंडिया युनिटेरियन असोसिएशनची यांच्या एकत्रिकारणातून  देवेंद्रनाथ टागोर यांच्या सहकार्याने **ब्राम्हो समाजाची** स्थापना.
- तत्व : एकेश्वरवाद, मूर्तिपूजा निषिद्ध
- रामचंद्र विद्याबागिश हे रॉय यांच्या निधनानंतर  **ब्राम्हो समाजाची** आठवड्याची सभा घेत

# वृत्तपत्रविषयक कार्य:

1821: 'संवादकौमुदी' हे पाक्षिक सुरू केले.

समाचार चंद्रिका हे पत्र सुरु केले

1822 : 'मिरात-उल्-अखबार' (पर्शियन भाषेतील साप्ताहिक).हे साप्ताहिक दर शुक्रवारी प्रकाशित होत.

## ग्रंथ :

1)तुहफत -उल -मुवहिद्दीन

2)वेदांत ग्रंथ

3)गौडिया व्याकरण

- **'ब्रम्हॅनिकल मॅगेझिन'** या मासिकातून ब्राम्हो समाजाच्या तत्त्वांचा प्रसार केला.

- 1829 : लॉर्ड विल्यम बेंटिकं यांच्या पुढाकाराने सतीबंदीचा कायदा संमत करून घेतला.(याधीच 1823 या वर्षी त्यांनी सतीची प्रथा बंद व्हावी म्हणून ब्रिटिश संसदेकडे अर्ज पाठवला होता. या अर्जावर जगन्नाथ शंकरशेठ यांनी स्वाक्षरी केली होती )
- 'शास्त्राच्या संमतीने केलेला खून' अशा शब्दात रॉय यांनी सतीप्रथेबद्दल उदगार काढले होते

- मुघल बादशहा अकबरशहा दुसरा याचे पेन्शन पुन्हा सुरू व्हावे यासाठी लंडनमध्ये प्रयत्न केले.अकबरशहा दुसरा यानेच रॉय यांना 'राजा' ही पदवी दिली.
- निधन: 27 सप्टेंबर 1833 ब्रिस्टॉल (इंग्लंड)

# देवेंद्रनाथ टागोर



- रॉय यांच्या निधनानंतर 1844 साली देवेंद्रनाथ टागोर यांनी ब्राम्हो समाजाची धुरा वाहिली.

- देवेंद्रनाथ  यांनी सर्वतत्त्वदीपिका सभा,तत्त्वबोधिनी सभा,हिंदू हितार्थी विद्यालय,नॅशनल असोसिएशन (1851) इ. संस्था त्यांनी स्थापन केल्या.
- ऋग्वेदाचा बंगाली भाषेत प्रथम अनुवाद देवेंद्रनाथांनीच केला
- संस्कृत व्याकरणही बंगाली भाषेत प्रथम त्यांनीच लिहिले.

## देवेंद्रनाथ टागोर यांचे साहित्य :

1) तत्त्वबोधिनी पत्रिका.

2) स्वरचित जीवनचरित (आत्मचरित्र )

3)ब्राह्मधर्म

4)आत्मतत्वविद्या



# केशवचंद्र सेन

- 1866 : 'भारतीय ब्राम्हो समाज' स्थापन केला.

- केशवचंद्र सेंन यांनी बंगाल बँकेत काम केले
- केशव चंद्र सेन यांनी आपल्या व्याख्यानांतून जातिभेद, अस्पृश्यता, स्त्रीशिक्षण यांविषयी प्रबोधन केले.
- त्यांनी चर्चमध्ये आंतरजातीय विवाह (1862) घडवून आणला.

- स्त्रियांकरिता वामबोधिनी पत्रिका  हे बंगाली भाषेतील मासिक सुरू केले.
- तसेच ब्राह्मिका समाज नावाचे पत्रक सुरु केले.
- ब्रम्हानंद या उपाधीने त्यांचा गौरव करण्यात आला
- कलकत्ता महाविद्यालय (1865) आणि अल्बर्ट महाविद्यालय (1872)स्थापन केले.

## केशवचंद्रांनी यांचे वृत्तपत्रे :

1) इंडियन मिरर

2) धर्मतत्त्व (मासिक)

3) सुलभ समाचार

4) धर्मसाधन

5)सन्डे मिरर

6)मद न गरल (दारू किंवा विष)

7)बालबंधू

8)परिचारिका (1880)

9)न्यू डिस्पेन्शन

- 29 ऑक्टोबर 1870 : केशवचंद्र सेन यांनी 'इंडियन रिफॉर्म्स असोशिएशन' ही संस्था स्थापन केली
- या दरम्यान देवेंद्रनाथ टागोर यांच्या नेतृत्वाखालील मूळचा समाज हा 'आदी ब्राम्हो समाज' या नावे ओळखला जाऊ लागला.
- भारतीय ब्राम्हो समाजातून केशवचंद्र सेन यांचे अनुयायी फुटून त्यांनी 'साधारण ब्राम्हो समाजा'ची स्थापना केली.



स्वामी दयानंद सरस्वती (1824 -1883)

- जन्म: 12 फेब्रुवारी 1824, टंकारा (गुजरात, काठेवाड) मूळ नाव : मूळशंकर करसनदास (अंबाशंकर) तिवारी
- 1845 : गृहत्याग करून संन्यास स्वीकारला व देशभर भटकंती सुरू.
- 1860-63 : मथुरेतील अंघ साधू विरजानंद यांचे शिष्यत्त्व पत्करून तीन वर्षे हिंदू धर्माचा अभ्यास केला.

केशवचंद्र सेन यांच्या सुचनेवरून हिंदी भाषेतून धर्मप्रसारास सुरूवात केली.

10 एप्रिल 1875 : मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली.

1877 : लाहोर येथे आर्य समाजाची शाखा स्थापन केली.

## ग्रंथ

1) सत्यार्थप्रकाश

2) संस्कारविधी

3) पंचमहायज्ञविधी

4) गोकरुणानिधी

- 'सत्यार्थप्रकाश' हा सर्व धर्माचा तुलनात्मक अभ्यास साधणारा ग्रंथ संस्कृत व हिंदी भाषेत प्रकाशित.
- देशात अनेक ठिकाणी 'संस्कृत पाठशाळांची' स्थापना केली
- लाहोर येथे पाश्चात्य शास्त्रे व संस्कृती यांचा अभ्यास करण्यासाठी Indian Academy ही संस्था स्थापना केली.

“ भारत हा भारतीय लोकांसाठी आहे” अशी घोषणा पहिल्यांदा स्वामी दयानंद सरस्वती यांनी केली

30 ऑक्टोबर 1883 : राजस्थानातील अजमेर येथे विषप्रयोगामुळे निधन.

# रामकृष्ण परमहंस (1836-1886)



- जन्म : 18 फेब्रुवारी 1836, पश्चिम बंगाल मधील हुगळी जिल्ह्यातील कामारपूर या खेड्यात
- मूळ नाव : गदाधर चाटोपाध्याय
- परमहंस यांनी सोप्या भाषेत हिंदू धर्माचे महत्त्व लोकांना सांगितले.

- लोकसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे असल्याचे सांगितले
- कलकत्त्याला दक्षिणेश्वर येथे असलेल्या कालिमाता मंदिराचे पुरोहित म्हणून ते काम पाहत होते.
- 16 ऑगस्ट 1886 या वर्षी कॅन्सरमुळे त्यांचे निधन झाले.



# स्वामी विवेकानंद
# (1863-1902)

- जन्म : 12 जानेवारी 1863, कोलकाता.
- 12 जानेवारी हा स्वामी विवेकानंदांचा जन्मदिन 'राष्ट्रीय युवक दिन' म्हणून साजरा केला जातो.
- मूळ नाव: नरेंद्रनाथ दत्त
- स्वामी रामकृष्ण परमहस हे त्यांचे गुरु होते

- 11 सप्टेंबर 1893 : अमेरिकेतील शिकागो येथील जागतिक सर्वधर्म परिषदेस उपस्थित राहून त्यांनी हिंदू धर्माचे महत्त्व जगाला पटवून दिले.
- 1896 : भारतीय धर्म आणि तत्वज्ञानाचा प्रचार करण्याच्या उद्देशाने न्यूयॉर्क येथे वेदांत सोसायटी ची स्थापना केली
- 1 मे 1897 : स्वामी विवेकानंदांनी आपले गुरू रामकृष्ण यांची स्मृती व कार्य यांच्या जाणिवेतून 'रामकृष्ण मिशन' या संस्थेची स्थापना केली.

- 1899 : बेलूर मठाची स्थापना
- बेलूर हे रामकृष्ण मिशनचे केंद्र बनले.
- इंग्लंडमधील वास्तव्यात कुमारी मार्गारेट नोबेल ही आयरिश विदुषी विवेकानंदांची शिष्या बनली.
- हिंदू धर्म स्वीकारून त्या भगिनी निवेदिता या नावे प्रसिध्दीस आल्या.

- 'उठा, जागे व्हा आणि ध्येयसिध्दी झाल्याशिवाय थांबू नका.’ असा युवकांना संदेश दिला
- निधन : 4 जुलै 1902, बेलूर मठ, पश्चिम बंगाल
- ‘आधुनिक राष्ट्रीय आंदोलनाचे आध्यात्मिक पिता’ या शब्दात त्यांचे वर्णन नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी केले

# थिऑसॉफिकल सोसायटी (1875)



- स्थापना : 17 नोव्हेंबर 1875, न्यूयॉर्क (अमेरिका) येथे.
- थिऑसॉफि या ग्रीक शब्दाचा अर्थ: परमेश्वरीय ज्ञान
- संस्थापक : मॅडम हेलेना ब्लॅव्हात्स्की (रशिया), कर्नल हेन्री स्टील अलकॉट (अमेरिका), विल्यम  जज (अमेरिका)

- पहिले अध्यक्ष : कर्नल हेन्री स्टील अलकॉट
- 1879 साली कर्नल अलकॉट व मॅडम ब्लॅव्हात्स्की स्वामी दयानंदांच्या निमंत्रणावरून भारतात आले.



- 1879 : या सोसायटीचे कार्यालय मुंबई येथे आणण्यात आले.
- 1882: या सोसायटीच्या कार्यालयाची मद्रास येथे स्थापना
- या सोसायटीने सुरवातीला आर्या समाजासोबत काम केले

- **उद्देश:** प्राचीन भारतीय संस्कृतीची जोपासना करणे व भारतीयांना त्याची महती पटवून देणे
- कर्नल हेन्री अलकॉट यांच्या निधनानंतर ॲनी बेझंट या 1907-1933 या काळात थिऑसॉफिकल सोसायटीच्या एकूण दुसऱ्या व पहिल्या महिला अध्यक्षा होत्या.



# भारतातील मुस्लिम समाजातील सुधारणा

- मुस्लिम समाजातील सुधारणा चळवळीचा आरंभ बंगालमध्ये नवाब अब्दुल लतीफ यांनी केला.
- 1863: नवाब अब्दुल लतीफ यांनी विज्ञान व शिक्षण प्रसारासाठी कोलकाता येथे 'मोहमेडन लिटररी सोसायटी' स्थापन केली.

- 1875 : मुस्लिम समाजातील तरूणांना पाश्चात्य शिक्षणाचा लाभ मिळावा यासाठी सर सय्यद अहमद खान यांनी 'मोहमेडन अँग्लो ओरिएंटल कॉलेज' स्थापन केले.
- 1920 : या कॉलेजचे रूपांतर 'अलिगढ मुस्लिम विद्यापीठात' झाले.



1.फरियादी चळवळ - हाजी शरियततुल्ला

2अलीगढ चळवळ - सर सय्यद अहमद खान

3. अहमदिया चळवळ  - मिर्झा गुलाम मुहम्मद

4.जामिया मिलिया इस्लामिया - मुहम्मद अली

# PYQ

**1) सतीप्रथेबद्दल 'शास्त्राच्या संमतीने केलेला खून', असे खालील-पैकी कोणी म्हटले आहे? (Comb. B & C 2024)**

(1) लॉर्ड बेंटीक (3) राजा राममोहन रॉय

(2) महात्मा फुले (4) ईश्वरचंद्र विद्यासागर

**2) 18 जून, 1823 रोजी केलेल्या 'सतीबंदी' च्या अर्जावर खालील व्यक्तीच्या सह्या होत्या :(Clerk 2021) मुख्य**

अ. राजा राम मोहन रॉय ब. बाळशास्त्री जांभेकर

क. विष्णुबुवा ब्रह्मचारी ड. जगन्नाथ शंकरशेठ

(1) अ बरोबर (2) ब आणि क बरोबर

(3) अ, ब आणि क बरोबर (4) अ आणि ड बरोबर

**3) 'संवाद कौमुदी' हे वृत्तपत्र कोणी सुरु केले ?**

(STI 2012)

(1) राजा राममोहन रॉय (3) देवेंद्रनाथ टैगोर

(2) केशव चंद्र सेन (4) ईश्वरचंद्र विद्यासागर

**4) राममोहन रॉय यांच्या मृत्यूनंतर —--------- हे ब्राह्मोसमाजाची आठवड्याची प्रार्थना घेत असत. (ASO 2016)**

(1) देवेंद्रनाथ टागोर (3) राजनारायण बोस

(2) केशवचंद्र सेन (4) रामचंद्र विद्याबागिश

**5) 1885 मध्ये स्वामी दयानंद सरस्वती यांनी —------- मध्ये आर्य समाजाची स्थापना केली.(PSI 2020)**

(1) जालंधर (2) रावळपिंडी

(3) लाहोर (4) मुंबई

**6)स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना कोणत्या वर्षी केली ? (STI 2012)**

(1) 1895 (2) 1896

(3) 1897 (4) 1898

**7) "ब्राम्होसमाज" स्थापन करण्यापूर्वी राजा राममोहन रॉय यांनी इ. स. 1815 साली 'आत्मीय सभा' स्थापन केली, त्यावेळी त्यांच्या बरोबर खालील कोणते सहकारी होते ? (2018)**

(a) द्वारकानाथ टागोर, प्रसन्नकुमार टागोर

(b) डॉ. राजेंद्रलाल मिश्र, राजा कली (c) शंकर घोषाल, आनंद प्रसाद बॅनर्जी

(d) केशवचंद्र सेन, देवेंद्रनाथ टागोर

(1) (a) आणि (d) फक्त (2) (b), (c) आणि (d)

(3) (a), (b) आणि (c) फक्त (4) फक्त (d) फक्त

**8)थिऑसॉफिकल सोसायटी विषयी पुढीलपैकी काय खरे आहे ?**

**(2019)**

(a) थिओसॉफीकल सोसायटीच्या मान्यतेनुसार प्राचीन हिंदुधर्म हा जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक धर्म होय.

(b) थिऑसॉफी म्हणजे सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करणे होय.

(1) (a) बरोबर (b) चूक

(2) (a) चूक (b) बरोबर

(3) दोन्ही बरोबर

(4) दोन्ही चूक


Thank
You